# मुंबई विदयापीठ

क्र.का.प्रा.वि./आयसीडी/२०२२-२३/२४४

क्र.२/२०२२-२३ गोपनीय

व्यवस्थापन परिषद

**मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२२-२३ मधील**

**१६ नोव्हेंबर २०२२ च्या बैठकीचे इतिवृत्त**

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा बुधवार, दिनांक १६ नोव्हेंबर, २०२२ रोजी सांयकाळी ४:०० वाजता आयोजित करण्यात आली आहे, हि सभा आभासी पद्धतीने घेण्याचे ठरविण्यात आले होते.

सदर बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते.

| अनु. क्र. | मां. सदस्याचे नाव | पदनाम | उपस्थिती / अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | प्रा. दिगंबर शिर्के (प्रभारी कुलगुरू) | अध्यक्ष | उपस्थित |
| २. | प्रा.अजय भामरे (प्रभारी प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३. | डॉ. कविता लघाटे | सदस्य | अनुपस्थित |
| ४. | डॉ. अनिल कुमार सिंग | सदस्य | अनुपस्थित |
| ५. | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ६. | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ७. | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ८. | प्रा. शैलेंद्र देवळाणकर (प्रभारी कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| ९. | प्रा. (सीए) प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित | उपस्थित |
| १०. | डॉ. प्रसाद कारंडे (प्रभारी संचालक, प.व मु मं) | निमंत्रित | उपस्थित |

**श्रद्धांजली**

**गजानन दर्णे**

ज्येष्ठ साहित्यिक गजानन दर्णे यांचे वृधपकाळाने दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९३ वर्षाचे होते.

**राकेश कुमार**

दिग्दर्शक राकेश कुमार यांचे कर्करोगामुळे दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८१ वर्षाचे होते.

**सुनील शेंडे**

ज्येष्ठ अभिनेते सुनील शेंडे यांचे अल्पशा आजाराने दिनांक १५ नोव्हेंबर, २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ४६ वर्षाचे होते.

**सिद्धांत वीर सूर्यवंशी**

प्रसिद्ध अभिनेता सिद्धांत वीर सूर्यवंशी यांचे हृदयविकाराच्या आजाराने दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ रोजी निधन झाले. मुर्त्यूसमयी ते ४६ वर्षाचे होते.

**कल्याणी कुरळे - जाधव**

अभिनेत्री कल्याणी कुरळे - जाधव यांचा दिनांक १३ नोव्हेंबर, २०२२ रोजी अपघाती निधन झाले.

| **बाब क्र.** | **व्यवस्थापन परिषदेचीबाब** | **विभाग** |
|---|---|---|
| १ | माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान विभाग (DICT) मुंबई विद्यापीठ येथे शिक्षकेत्तर तांत्रिक पदे नॅशनल इन्फॉर्मेटिकस सेन्टर सर्विसेजइन्कोपोरर्टेड (NICSI) या कंपनीमार्फत घेऊन आधिकचा पूर्वानुभव व अधिकची शैक्षणिक अहर्ता असलेल्या व्यक्तीची नियुक्ती करून एजेन्सीस अधिकचे वेतन अदा करण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान विभाग (DICT) मुंबई विद्यापीठ येथे शिक्षकेत्तर तांत्रिक पदे नॅशनल इन्फॉर्मेटिकस सेन्टर सर्विसेज इन्कोपोरर्टेड (NICSI) या कंपनीमार्फत घेऊन आधिकचा पूर्वानुभव व अधिकची शैक्षणिक अहर्ता असलेल्या व्यक्तीची नियुक्ती करून एजेन्सीस अधिकचे वेतन अदा करण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषद मध्ये मान्य करण्यात आली. | |
| २ | शासन निर्णय क्र. भांखस २०२१/प्र.क्र.८/उद्योग-४, दिनांक ७ मे २०२१ अन्वये दरपत्रकाच्या आधारे मुंबई विद्यापीठातील विविध विभागांच्या तसेच राष्ट्रीय कार्यक्रमाकरिता करण्यात येणाऱ्या वस्तू व सेवांच्या खरेदीची ई-टेंडरिंग मर्यादा रु. ३,००,०००/- वरून १०,००,०००/- पर्यंत वाढविण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेकरिता सादर करण्यात येत आहे. | विद्यानगरी प्रशासकीय विभाग |

| | | |
|---|---|---|
| ठराव | शासन निर्णय क्र. भांखस २०२१/प्र.क्र.८/उद्योग-४, दिनांक ७ मे २०२१ अन्वये दरपत्रकाच्या आधारे मुंबई विद्यापीठातील विविध विभागांच्या तसेच राष्ट्रीय कार्यक्रमाकरिता करण्यात येणाऱ्या वस्तू व सेवांच्या खरेदीची मर्यादा रु. ३,००,०००/- वरून १०,००,०००/- पर्यंत वाढविण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. परंतु केवळ अत्यावशक असताना मा. कुलगुरूंच्या परवानगीने उपरोक्त खरेदीची प्रक्रियेचा अवलंब करावा,असे ठरले. | |
| ३ | मा. कुलपती कार्यालय यांनी प्रकाशित केलेल्या इंद्रधनुष्य, आविष्कार, क्रीडा महोत्सव आणि आव्हान या कार्यक्रमांच्या/स्पर्धांच्या सुधारित नियमावलींची स्वीकृती आणि त्या अनुषंगाने मा. कुलगुरू यांनी मुंबई विद्यापीठाच्या आविष्कार या संशोधन महोत्सवाची सुधारित नियमावली तयार करण्यासाठी नामनिर्देशित केलेल्या समितीने तयार केलेल्या सुधारित नियमावलीस मान्यता देणेबाबत | विद्यार्थी विकास विभाग |
| ठराव | मा. कुलपती कार्यालय यांनी प्रकाशित केलेल्या इंद्रधनुष्य, आविष्कार, क्रीडा महोत्सव आणि आव्हान या कार्यक्रमांच्या/स्पर्धांच्या सुधारित नियमावलींची स्वीकृती करण्यात आली. मा. कुलगुरू यांनी मुंबई विद्यापीठाच्या आविष्कार या संशोधन महोत्सवाची सुधारित नियमावली तयार करण्यासाठी नामनिर्देशित केलेल्या समितीने तयार केलेल्या सुधारित नियमावलीस मान्यता देण्यात आली. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

कुलसचिव (प्र)

प्र- कुलगुरू (प्र)

मा. कुलगुरू (प्र)